~~विस्तार अधिकारी (पंचायत)~~ RR

## [परिशिष्ट आठ]

(नियम ५ पहा)

जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी व ग्राम विस्तार) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम) (कार्यकारी व ग्राम विस्तार) यामध्ये समाविष्ट असणाऱ्या पदांवरील नेमणुकीकरिता, उमेदवारांच्या अर्हता व नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम

| अनुक्रमांक | सेवा व संवर्ग | पद | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी आणि ग्राम विस्तार) | विस्तार अधिकारी (पंचायत आणि समाजकल्याण), द्वितीय श्रेणी | [(१) नियुक्ती ही पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करण्यात येईल—<br>(अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी व ग्रामविस्तार), श्रेणी तीनमध्ये असलेल्या व ज्यांनी त्या पदावर किमान तीन वर्षे अखंड सेवा केली आहे अशा ग्रामसेवकांना अधिक त्यांना पदोन्नती देऊन, किंवा<br>(ब) (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसलेले जे उमेदवार २८ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील; आणि<br>(दोन) जे उमेदवार विधिद्वारे संस्थापित विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे :<br>परंतु, ग्रामीण समाजकल्याण व स्थानिक विकास कार्यक्रमाचा तीन वर्षांचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीचे गुणोत्तर ७५ : २५ असे असेल.] |

*शासकीय अधिसूचना, दिनांक २७ नोव्हेंबर १९७८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



CamScanner

CamScanner